Prepp
Your Personal Exams Guide

रेलवे भर्ती बोर्ड / RAILWAY RECRUITMENT BOARD

सत्यमेव जयते

सीo ईoएन o ०९ /२०२५ -7 वें सीपीसी वेतन मैट्रिक्स के लेवल १ में विभिन्न पदों हेतु

# CEN 09/2025 - Various Posts in Level 1 of 7th CPC Pay Matrix

| | |
|---|---|
| Test Date | 11/08/2026 |
| Test Time | 9:00 AM - 10:30 AM |
| Subject | RRB Level 01 Stage I 2025 |

Section : **General Science**

**Q.1** **पाण्याखाली उभी असलेली व्यक्ती जेव्हा काठावर असलेल्या झाडाकडे वरच्या दिशेने पाहते तेव्हा ते झाड त्याच्या मूळ स्थानापेक्षा वेगळ्या स्थितीत असल्याचे दिसते. या स्थितीतील स्पष्ट बदलासाठी खालीलपैकी कोणते तत्व जबाबदार आहे?**

Ans
- ✗ A. पाण्याच्या पृष्ठभागावरील विवर्तनामुळे झाडाची प्रतिमा तयार होते
- ✓ B. पाणी आणि हवा यांच्या आंतरपृष्ठावर होणाऱ्या अपवर्तनामुळे झाडापासून येणारे प्रकाशकिरण वाकतात
- ✗ C. पाणी झाडापासून येणाऱ्या प्रकाशाला वेगवेगळ्या रंगांमध्ये विखुरते
- ✗ D. झाडापासून येणारे प्रकाशकिरण पाण्याच्या पृष्ठभागावरून परावर्तित होतात

**Q.2** **जर एखाद्या तारेचा रोध दुप्पट केला, आणि त्यातून तेवढाच विद्युतप्रवाह तितक्याच वेळेसाठी प्रवाहित झाला, तर निर्माण होणाऱ्या उष्णतेचे काय होईल?**

Ans
- ✗ A. अर्धी होईल
- ✗ B. चौपट होईल
- ✗ C. तितकीच राहील
- ✓ D. दुप्पट होईल

**Q.3** **उंटाच्या कुबडामध्ये/वशिंडामध्ये (Hump) चरबी साठवण्याचे मुख्य उत्क्रांतीविषयक महत्त्व खालीलपैकी कोणते विधान सर्वोत्तमरीत्या स्पष्ट करते?**

Ans
- ✗ A. संततीचे पोषण करण्यासाठी ते दूध उत्पादनाला थेट पर्याय प्रदान करते.
- ✗ B. वरगिक वर्गीकरणामध्ये बदल करण्यासाठी ते शारीररचनाशास्त्रीय वैशिष्ट्यांमध्ये बदल घडवून आणते.
- ✓ C. हे अत्यंत प्रतिकूल वातावरणात जगण्यास मदत करणारा एक संरचनात्मक राखीव साठा प्रदान करते.
- ✗ D. वाळवंटातील भक्षकांपासून वेगाने पळ काढणे सुलभ करण्यासाठी ते शरीराचे वस्तुमान कमी करते.

**Q.4** **कोणती परिस्थिती एखाद्या वस्तूवर कार्य करणाऱ्या असंतुलित बलाचे सर्वोत्तम उदाहरण आहे?**

Ans
- ✓ A. लाथ मारल्यानंतर घरंगळत जाणारा फुटबॉल
- ✗
- ✗ C. डेस्कवर ठेवलेला न हलणारा कप
- ✗ D. गॅरेजमधील विराम अवस्थेतील कार

**Q.5** **एक संवर्धन जीवशास्त्रज्ञ (कंझर्व्हेशन बायोलॉजिस्ट) संरक्षणासाठी भौगोलिक क्षेत्रांना प्राधान्य देत आहे. तिच्या पाहण्यात असा एक प्रदेश येतो जिथे त्या विशिष्ट क्षेत्रापुरत्याच मर्यादित असलेल्या (स्थानिकविशिष्ट) अनेक प्रजाती आढळतात आणि त्या प्रदेशातील बराचसा नैसर्गिक अधिवास नष्ट झाला आहे. वैज्ञानिक व्याख्येच्या आधारे, या प्रदेशाचे सर्वोत्तम वर्णन करणारी संज्ञा कोणती आहे?**

Ans
- ✗ A. जैवविविधतेने समृद्ध परिसंस्था (बायोडायवर्स इकोसिस्टम)
- ✗ B. पर्यावरणीय निकेत (इकोलॉजिकल निश)
- ✗ C. स्थानिकविशिष्ट प्रदेश (एन्डेमिक रिजन)
- ✓ D. जैवविविधतेचा संवेदनशील भाग (बायोडायव्हर्सिटी हॉटस्पॉट)

Q.6 जेव्हा सोडियम हायड्रॉक्साइड पाण्यात विरघळतो, तेव्हा द्रावणाला आम्लारी बनवण्यासाठी प्रामुख्याने कोणत्या प्रकारचे आयन जबाबदार असतात?

Ans
A. हायड्रोजन आयन ($H^+$)
B. सोडियम आयन ($Na^+$)
C. कार्बोनेट आयन ($CO_3^{2-}$)
D. हायड्रॉक्साइड आयन ($OH^-$)

Q.7 एक शिक्षक दोन विरुद्ध दिशांना ठेवलेले लोलक (Prisms) वापरतात आणि त्या दोन्हींमधून पांढऱ्या प्रकाशाचा किरण जाऊ देतात. दुसऱ्या लोलकानंतर ठेवलेल्या पडद्यावर काय अपेक्षित परिणाम दिसेल?

Ans
A. रण संपल्यावर एक काळा भाग दिसतो.
B. उलट रंगांचा क्रम असलेला वर्णपट (Spectrum) तयार होतो.
C. पडद्यावर एक ढरा ठिपका दिसतो.
D. मूळ रंगांच्या पलीकडे रंगांचा एक नवीन संच तयार होतो.

Q.8 गुटख्याच्या सेवनामुळे भारतात कोणत्या प्रकारचा कर्करोग जास्त प्रमाणात आढळतो?

Ans
A. तोंडाचा कर्करोग
B. हाडांचा कर्करोग
C. त्वचेचा कर्करोग
D. प्रोस्टेट कर्करोग

Q.9 चिखलयुक्त पाणी, साखरेचे द्रावण आणि दूध अशी तीन मिश्रणे तुम्हाला दिली आहेत. यामध्ये निलंबन कोणते आहे?

Ans
A. चिखलयुक्त साखर
B. दूध
C. चिखलयुक्त णी
D. साखरेचे द्रावण

Q.10 विद्यार्थ्यांचा एक गट त्यांच्या शाळेच्या प्रवेशद्वारासाठी व्हीलचेअरच्या उतरणीची (Ramp) रचना करत आहे. साध्या यंत्राच्या संकल्पनेनुसार काय बदल केल्यास व्हीलचेअर तेवढ्याच उंचीवर ढकलणे अधिक सोपे होईल?

Ans
A. तेवढ्याच उंचीपर्यंत होचण्यासाठी उतरणीऐवजी (Ramp) यऱ्या तयार करणे
B. उंची तेवढीच ठेवून उतरणीची (Ramp) लांबी वाढवणे
C. चलचा वेग कमी करण्यासाठी उतरणीच्या (Ramp) पृष्ठभागावर घर्षण वाढवणारे पथ ʿ लावणे
D. तेवढ्याच उंचीसाठी उतरणीची (Ramp) लांबी कमी करून तिचा चढ स्त करणे

Q.11 खाली दिलेल्या दोन विधानांचा संदर्भ घ्या आणि योग्य पर्याय निवडा.

विधान A: जेव्हा एक संयुग दोन किंवा अधिक सरल पदार्थांमध्ये विघटित होते, तेव्हा अपघटन अभिक्रिया घडते.
विधान B: अपघटन अभिक्रियांना नेहमी ऑक्सिजनची उपस्थिती आवश्यक असते.

Ans
A. न A आणि B हे न्ही अयोग्य आहेत.
B. न A योग्य आहे, पण B अयोग्य आहे.
C. न A आणि B हे न्ही योग्य आहेत.
D. न A अयोग्य आहे, पण B योग्य आहे.

Q.12 हे रूदरफोर्डच्या मॉडेलनुसार, धन प्रभार ________ असते.

Ans
A. अणूमध्ये एकसमानपणे पसरलेले
B. केंद्राशी एकवटलेले
C. बाह्य कवचांत आढळते
D. इलेक्ट्रॉनसह उपस्थित

Prepp
Your Personal Exams Guide

Q.13 एका शास्त्रज्ञाला प्रयोगशाळेतील डिशमध्ये तयार झालेल्या मानवी युग्मनजामध्ये (zygote मध्ये) गुणसूत्रांची योग्य संख्या आहे, याची खात्री करायची आहे. या युग्मनजामध्ये गुणसूत्रांची किती संख्या असली पाहिजे?

Ans
✔ A. 46
✗ B. 23
✗ C. 92
✗ D. 69

Q.14 एखाद्या कवचातील इलेक्ट्रॉनची कमाल संख्या कोणत्या सूत्राद्वारे दर्शविली जाते? (येथे, 'n' ही कक्षेची संख्या आहे)

Ans
✗
✔ B. $2n^2$
✗ C. 2n
✗ D. $2n^3$

Q.15 खालीलपैकी कोणते विधान आयनिक संयुगे कठीण पण ठिसूळ का असतात याचे उत्तम स्पष्टीकरण देते?

Ans
✔ A. तीव्र आकर्षणामुळे ते कठीण होतात; सरकणारे थर त्यांना विलग करतात
✗ B. त्यांच्याकडे धातूची जाळी असते
✗ C. कमकुवत आकर्षणामुळे ते मऊ आणि लवचिक बनतात
✗ D. ते सामान्य तापमानात द्रवपदार्थ असतात

Q.16 जर एखाद्या विद्यार्थ्याला वनस्पतीच्या खोडाची किंवा मुळांची लांबी वाढवण्यासाठी सक्रियपणे विभाजित होणाऱ्या पेशींचे निरीक्षण करायचे असेल, तर त्याने सूक्ष्मदर्शकाखाली कोणत्या विशिष्ट ऊतींचे परीक्षण करावे?

Ans
✗ A. स्थायी ऊती
✗ B. आंतरीय विभाजी ऊती
✗ C. पार्श्व विभाजी ऊती
✔ D. प्ररोह विभाजी ऊती

Q.17 खालीलपैकी कोणत्या पर्यायामध्ये भाराचे सर्वोत्तम वर्णन केले आहे?

Ans
✗ A. एखाद्या प्रणालीमध्ये साठवलेली ऊर्जा
✗ B. खालील दिशेने लागू केलेले बल
✔ C. हलवली जाणारी किंवा उचलली जाणारी वस्तू
✗ D. उचलण्यासाठी वापरले जाणारे यंत्र

Q.18 विराम अवस्थेत असलेल्या वस्तूवर असंतुलित बलांचा काय परिणाम होतो?

Ans
✗ A. त्यामुळे वस्तूचे वस्तुमान नेहमीच वाढते
✔ B. त्यामुळे वस्तूची हालचाल सुरू होते
✗ C. त्यामुळे वस्तूचा रंग बदलतो
✗ D. ती वस्तू विराम अवस्थेत राहते

Q.19 कोणता क्रम अन्नसाखळीतील कीटकनाशकांच्या संहितेत झालेली वाढ योग्यरित्या दर्शवतो?

Ans
✗ A. गवत→ बेडूक → नाकतोडा→ साप → ससाणा
✔ B. गवत→ नाकतोडा→ बेडूक → साप → ससाणा
✗ C. ससाणा→ साप → बेडूक → नाकतोडा→ गवत
✗ D. नाकतोडा→ गवत → बेडूक → ससाणा → साप

Prepp Your Personal Exam Guide

Q.20 अंतर्गोल आरशाच्या वक्रताकेंद्रातून जाणारा किरण आरशावर आपटतो. तर अपवर्तित किरणाचा मार्ग कोणता?

Ans
- ✔ A. तो आपल्या मूळ मार्गावरून प्रत्यागमन करतो
- ✗ B. तो मुख्य अक्षास ून अपसृत होतो
- ✗ C. तो अक्षाला समांतर होतो
- ✗ D. तो भीमध ून तो

Q.21 साबणाच्या द्रावणाचा गढूळपणा कशामुळे असतो?

Ans
- ✗ A. तेलाद्वारे प्रकाशाचे शोषण
- ✗ B. बुडबुड्यांद्वारे प्रकाशाचे परावर्तन
- ✔ C. मायसेल्सद्वारे प्रकाशाचे रण
- ✗ D. आयनद्वारे प्रकाशाचे अपवर्तन

Q.22 वातावरणाच्या वरच्या भागातील ओझोन थराचे मुख्य कार्य काय आहे?

Ans
- ✗ A. वावरणाल कार्बन डायऑक्साइडची तळी वाढणे
- ✔ B. सूर्याकडून येणारे अतिल रणोत्सग शोषून घेणे
- ✗ C. ऊस निर्माण करणे
- ✗ D. ऑक्सीय जीवला आर देण्यासाठी ऑक्सिजन निर्माण करणे

Q.23 उजव्या हाताचा अंगठ्याचा नियम _______________ म्हणूनही ओळखला जातो.

Ans
- ✗ A. फ्लेमिंगचा नियम
- ✔ B. मॅक्सवेलचा कॉर्कस्क्रू नियम
- ✗ C. ओहमचा नियम
- ✗ D. फॅरेडेचा नियम

Q.24 प्रकाशसंश्लेषणादरम्यान वनस्पतींच्या पानांवरील पर्णरंध्रांचे मुख्य कार्य कोणते?

Ans
- ✔ A. वायूंची देवाणघेवाण शक्य करणे
- ✗ B. ऑक्सिजन शोषून घेणे
- ✗ C. च पमान स्थिर ठेवणे
- ✗ D. $CO_2$ चा प्रवेश रोखणे

Q.25 खालीलपैकी कोणत्या हायड्रोकार्बन्सची समावेशक विक्रिया सर्वात जलद होईल?

Ans
- ✔ A. इथीन
- ✗ B. ईथेन
- ✗ C. प्रोपेन
- ✗ D. मिथेन

Section : **Mathematics**

Q.26 खालीलपैकी कोणती संख्या 9 ने विभाज्य आहे?

Ans
- ✔ A. 5,328
- ✗ B. 4,317
- ✗ C. 6,018
- ✗ D. 3,624

Q.27 एका सामग्रीचा (data चा) मध्य आणि बहुलक अनुक्रमे 62.4 आणि 36.8 आहेत. अनुभवजन्य सूत्राचा (empirical formula) वापर करून सामग्रीचा मध्यक काढा. (उत्तर एका दशांश स्थानापर्यंत पूर्ण करा)

Ans
- ✗ A. 54.2
- ✔ B. 53.9
- ✗ C. 55.8
- ✗ D. 55.5

Prepp
Your Personal Exams Guide

Q.28 जर $\cos A = \frac{5}{13}$ असेल आणि A हा एक लघुकोन असेल, तर $\frac{\sin A}{\cos A}$ चे मूल्य किती आहे?

Prepp
Your Personal Exams Guide

Ans
- ✗ A. $\frac{13}{5}$
- ✓ B. $\frac{12}{5}$
- ✗ C. $\frac{12}{13}$
- ✗ D. $\frac{5}{12}$

Q.29 I, II, III आणि IV या चार दुकानांमध्ये कुकरची चिन्हांकित किंमत समान आहे. दुकान I मध्ये 54% आणि 61% च्या दोन सलग सवलती दिल्या आहेत, दुकान II मध्ये 17% आणि 49% च्या सलग सवलती दिल्या आहेत, दुकान III मध्ये 25% आणि 36% च्या सलग सवलती दिल्या आहेत आणि दुकान IV मध्ये कुकरच्या चिन्हांकित किंमतीवर 95%, 20% आणि 68% च्या सलग सवलती दिल्या आहेत. कोणते दुकान कुकर सर्वात कमी किंमतीत विकत आहे?

Ans
- ✗ A. I
- ✗ B. III
- ✗ C. II
- ✓ D. IV

Q.30 सलग 4 विषम संख्यांची सरासरी 36 आहे. त्यांपैकी सर्वात मोठ्या आणि सर्वात लहान संख्येची बेरीज किती असेल?

Ans
- ✗ A. 74
- ✗ B. 66
- ✗ C. 68
- ✓ D. 72

Q.31 एका लॅपटॉपची 10% तोट्याने आणि डेस्कटॉपची 15% नफ्याने विक्री केल्यावर, रीटाला एकूण ₹8,000 मिळतात. जर तिने लॅपटॉपची 10% नफ्याने आणि डेस्कटॉपची 20% नफ्याने विक्री केल्यास, तिला एकूण ₹20,000 चा नफा होतो. लॅपटॉपची खरेदी किंमत (₹ मध्ये) काढा.

Ans
- ✗ A. 36,000
- ✓ B. 40,000
- ✗ C. 60,000
- ✗ D. 80,000

Q.32 जर 45A216B या 7-अंकी संख्येला 3 ने (नि:शेष) भाग जात असेल, तर (A + B) चे किमान मूल्य किती असेल?

Ans
- ✗ A. 2
- ✓ B. 0
- ✗ C. 5
- ✗ D. 3

Q.33 रघुची उंची 140 cm आहे. तो दिव्याच्या खांबापासून 180 cm अंतरावर उभा आहे. त्याची प्रकाशामुळे पडणारी त्याची सावली 70 cm लांब आहे. तर दिव्याच्या खांबाची उंची काढा.

Ans
- ✗ A. 250 cm
- ✗ B. 350 cm
- ✓ C. 500 cm
- ✗ D. 300 cm

Q.34 सरळ रूप द्या: $\frac{\cot A + \operatorname{cosec} A - 1}{\cot A + 1 - \operatorname{cosec} A} - \frac{1}{\sin A} - \cot A$

Prepp
Your Personal Exams Guide

Ans
- ✗ A. $\sin A$
- ✗ B. $\sec A$
- ✓ C. $0$
- ✗ D. $1$

Q.35 3.5 वर्षांसाठी, 29% वार्षिक व्याजदराने कर्जाऊ घेतलेल्या ₹500 या रकमेवर मिळणारे सरळव्याज (₹ मध्ये) काढा.

Ans
- ✓ A. 350
- ✗ B. 330
- ✗ C. 450
- ✗ D. 400

Q.36 A आणि B संयुक्तपणे एक व्यवसाय सुरू करतात. A ची गुंतवणूक B च्या गुंतवणुकीच्या तिप्पट आहे. तर ₹5,524 च्या वार्षिक नफ्यात A चा वाटा काढा.

Ans
- ✗ A. ₹4,113
- ✓ B. ₹4,143
- ✗ C. ₹4,123
- ✗ D. ₹4,133

Q.37 एका शहराची लोकसंख्या दरवर्षी 25% नी वाढते. जर सध्याची लोकसंख्या 16,000 असेल, तर 3 वर्षांनंतर लोकसंख्या किती असेल?

Ans
- ✗ A. 32,000
- ✓ B. 31,250
- ✗ C. 30,250
- ✗ D. 28,800

Q.38 717A0280 या संख्येला 3 ने (नि:शेष) भाग जाण्यासाठी A चे सर्वात लहान मूल्य किती असावे?

Ans
- ✗ A. 8
- ✗ B. 1
- ✗ C. 5
- ✓ D. 2

Q.39 A आणि B स्थानकांवरून अनुक्रमे 70 km/h आणि 80 km/h या वेगाने दोन ट्रेन एकमेकींकडे धावत आहेत. जेव्हा त्या एकमेकींना भेटतात, तेव्हा असे दिसून येते की दुसऱ्या ट्रेनने पहिल्या ट्रेनपेक्षा 150 km अधिक अंतर पार केले आहे. तर त्या दोन स्थानकांमधील अंतर किती असेल?

Ans
- ✗ A. 2260 km
- ✗ B. 2240 km
- ✓ C. 2250 km
- ✗ D. 2230 km

Q.40 एक व्यक्ती प्रती महिना ₹3654 रुपये खर्च करते आणि त्याच्या उत्पन्नाच्या $12\frac{1}{2}$% बचत करते. तर त्याचे मासिक उत्पन्न किती असेल?

Ans
- ✗ A. ₹4166
- ✓ B. ₹4176
- ✗ C. ₹4196
- ✗ D. ₹4186

Prepp Your Personal Exam Guide

| | | |
|---|---|---|
| Q.41 | रमणचे उत्पन्न ₹70,900 आहे. तो त्याच्या उत्पन्नातील 12% बचत करतो. जर त्याचे उत्पन्न 39% ने वाढले आणि खर्च 50% ने वाढला, तर त्याच्या बचतीत काय बदल होईल? |
| Ans | ✗ A. ₹3,550 ने कमी होईल<br>✗ B. ₹3,546 ने वाढले<br>✓ C. ₹3,545 ने कमी होईल<br>✗ D. ₹3,548 ने वाढले |

| | |
|---|---|
| Q.42 | एक कार 30 मिनिटांसाठी 40 km/hr या स्थिर वेगाने प्रवास करते, त्यानंतर पुढील 40 मिनिटांसाठी 60 km/h या स्थिर वेगाने प्रवास करते. संपूर्ण प्रवासादरम्यान त्या कारचा सरासरी वेग (km/hr मध्ये), दशांश चिन्हाच्या पुढे दोन स्थळापर्यंत मर्यादित, किती असेल? |
| Ans | ✓ A. 51.43<br>✗ B. 54.67<br>✗ C. 50.34<br>✗ D. 53.72 |

| | |
|---|---|
| Q.43 | 350 विद्यार्थ्यांना एका विषयात मिळालेल्या गुणांची सरासरी 75 आहे. पहिल्या 100 विद्यार्थ्यांची सरासरी 85 आणि शेवटच्या 100 विद्यार्थ्यांची सरासरी 65 आढळली.तर उरलेल्या 150 विद्यार्थ्यांचे सरासरी गुण किती असतील? |
| Ans | ✗ A. 65<br>✗ B. 55<br>✗ C. 85<br>✓ D. 75 |

| | |
|---|---|
| Q.44 | जर एका दंडगोलाची उंची आणि तळाची त्रिज्या अनुक्रमे 10% आणि 5% ने वाढवली, तर त्याचे घनफळ किती टक्क्यांनी वाढेल? (उत्तर दशांश चिन्हाच्या पुढे 1 स्थांनापर्यंत मर्यादित करा) |
| Ans | ✓ A. 21.3%<br>✗ B. 22.2%<br>✗ C. 24.2%<br>✗ D. 20.3% |

| | |
|---|---|
| Q.45 | शिरोबिंदू A(3,2), B(11,6) आणि C(7,14) असलेल्या त्रिकोणाचे क्षेत्रफळ काढा. |
| Ans | ✗ A. 42 एकक$^2$<br>✗ B. 32 एकक$^2$<br>✓ C. 40 एकक$^2$<br>✗ D. 36 एकक$^2$ |

| | |
|---|---|
| Q.46 | दोन भावांचे सध्याचे वय 3 : 5 गुणोत्तरात आहे. आतापासून 12 वर्षांनंतर, त्यांचे वय 9 : 11 गुणोत्तरात असेल, तर लहान भावाचे सध्याचे वय किती असेल? |
| Ans | ✗ A. 10 वर्षे<br>✗ B. 12 वर्षे<br>✓ C. 6 वर्षे<br>✗ D. 18 वर्षे |

| | |
|---|---|
| Q.47 | एक बँक सहामाही आधारावर गणना करून वार्षिक 4.5% दराने चक्रवाढ व्याज देते. एका ग्राहकाने वर्षाच्या 1 जानेवारी आणि 1 जुलै रोजी प्रत्येकी ₹8,138 जमा केले. वर्षाच्या अखेरीस मिळणारे व्याज खालीलप्रमाणे किती असेल? (दोन दशांश स्थानापर्यंत अचूक) |
| Ans | ✓ A. ₹553.43<br>✗ B. ₹538.12<br>✗ C. ₹540.05<br>✗ D. ₹562.53 |

Prepp
Your Personal Exams Guide

Prepp
Your Personal Exams Guide

Q.48 पाईप A एक टाकी 3 तासांत भरू शकतो, पाईप B तीच टाकी 9 तासांत भरू शकतो आणि पाईप C तीच टाकी 18 तासांत भरू शकतो. जर हे तिन्ही पाईप्स एकत्र चालू केले, तर तीच टाकी अर्धी भरण्यासाठी किती वेळ (तासांमध्ये) लागेल?

Ans
- ✗ A. 4
- ✗ B. 2
- ✓ C. 1
- ✗ D. 3

Q.49 एक पुरुष त्याच्या मुलापेक्षा 24 वर्षांनी मोठा आहे. आतापासून दोन वर्षांनंतर, त्याचे वय त्याच्या मुलाच्या वयाच्या दुप्पट असेल. तर मुलाचे सध्याचे वय किती असेल?

Ans
- ✗ A. 21 वर्षे
- ✗ B. 25 वर्षे
- ✗ C. 26 वर्षे
- ✓ D. 22 वर्षे

Q.50 खालील स्तंभालेख सहा वेगवेगळ्या वर्षांत तीन वेगवेगळ्या दलांमध्ये भरती झालेल्या सैनिकांची संख्या (हजारांमध्ये) दर्शवतो. त्यानंतरच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी खालील आलेखाचा काळजीपूर्वक अभ्यास करा.
वर्ष 2022 मध्ये हवाई दलात (Airforce) भरती झालेल्या सैनिकांच्या संख्येत, आदल्या वर्षाच्या (मागील वर्षाच्या) तुलनेत किती टक्के वाढ झाली होती?




(संदर्भ: Army=लष्कर, Airforce= हवाईदल, Navy=नौदल)

Ans
- ✗ A. $30\frac{1}{3}\%$
- ✓ B. $33\frac{1}{3}\%$
- ✗ C. $32\frac{1}{3}\%$
- ✗ D. $31\frac{1}{3}\%$

Section : **General Intelligence and Reasoning**

Q.51 एका विशिष्ट तर्कानुसार 21 हे 41 शी संबंधित आहे. त्याचप्रकारे, 33 हे 65 शी संबंधित आहे, तर त्या तर्कानुसार खालीलपैकी काय 45 शी संबंधित असेल?
(सूचना : क्रिया संपूर्ण संख्येवर कराव्यात, तिच्यातील अंकांमध्ये त्या संख्येची विभागणी करू नये. उदाहरणार्थ, 13 – येथे 13 वर बेरीज/वजाबाकी/गुणाकार इ. क्रिया करणे अभिप्रेत आहे, मात्र 13 ची विभागणी 1 आणि 3 अशी करून 1 आणि 3 यांवर गणितीय क्रिया करणे अभिप्रेत नाही.)

Ans
- ✓ A. 89
- ✗ B. 87
- ✗ C. 91
- ✗ D. 93

Q.52 जर '×' म्हणजे '–', '÷' म्हणजे '×', '+' म्हणजे '÷' आणि '–' म्हणजे '+' असेल, तर खालील समीकरणातील प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?
8 ÷ 6 × 15 + 3 – 5 = ?

Ans
A. 39
B. 42
C. 48 ✔
D. 37

Q.53 एका विशिष्ट तर्कानुसार 16 हे 255 सह संबंधित आहे. त्याच तर्कानुसार, 11 हे 120 सह संबंधित आहे. त्याच तर्कानुसार, दिलेल्या पर्यायांपैकी 13 हा कशाशी संबंधित आहे?
(सूचना: संख्यांना त्यांच्या घटक अंकांमध्ये विभाजित न करता, पूर्ण संख्यांवर क्रिया कराव्यात. उदा.13 – 13 या संख्येवर केलेली क्रिया जसे की, 13 ची बेरीज/वजाबाकी/गुणाकार इ. क्रिया केली जाऊ शकते. 13 चे 1 आणि 3 मध्ये विभाजन करणे आणि नंतर 1 आणि 3 यांवर गणितीय क्रिया करणे अभिप्रेत नाही.)

Ans
A. 158
B. 168 ✔
C. 138
D. 148

Q.54 इंग्रजी वर्णक्रमानुसार LORU हे NQTW शी एका विशिष्ट प्रकारे संबंधित आहे. त्याचप्रकारे, GHKL हे IJMN शी संबंधित आहे. त्याच तर्कानुसार खालीलपैकी कोणत्या पर्यायाशी ZCFI संबंधित आहे?

Ans
A. BHYU
B. BHKO
C. BEHK ✔
D. BHER

Q.55 एका विशिष्ट सांकेतिक भाषेत,
A + B म्हणजे 'A हा B चा भाऊ आहे',
A – B म्हणजे 'A ही B ची मुलगी आहे',
A × B म्हणजे 'A ही B ची पत्नी आहे', आणि
A ÷ B म्हणजे 'A हा B चा मुलगा आहे'.

जर 'P + Q – R × S ÷ T' असेल, तर P चे T शी काय नाते आहे?

Ans
A. मुलीचा मुलगा
B. मुलगा
C. मुलाचा मुलगा ✔
D. भाऊ

Q.56 इंग्रजी वर्णक्रमावर आधारित, खालील चार अक्षर-समूह जोड्यांपैकी तीन एका विशिष्ट तऱ्हेने समान आहेत आणि ते मिळून एक गट तयार करतात. त्या गटात न बसणारा पर्याय कोणता आहे?
(सूचना: गटात न बसणारा हा त्यातील व्यंजन/स्वरांच्या संख्येवर किंवा अक्षर-समूहातील त्यांच्या स्थानावर आधारित नसावा.)

Ans
A. KR - HL
B. QT - NN
C. CN - ZH
D. OH - LC ✔

Q.57 Q, R, W, T, E, U आणि Y या प्रत्येकाची परीक्षा, सोमवारी सुरू होऊन त्याच आठवड्याच्या रविवारी संपणाऱ्या एकाच आठवड्याच्या वेगवेगळ्या दिवशी आहे. W ची परीक्षा शुक्रवारी आहे. W आणि Q यांच्या परीक्षांच्या दरम्यान केवळ 2 व्यक्तींची परीक्षा आहे. Y ची परीक्षा T च्या लगत आधी आहे आणि U ची परीक्षा R च्या लगत नंतर आहे. E आणि T यांच्या परीक्षांच्या दरम्यान केवळ 2 व्यक्तींची परीक्षा आहे. तर R नंतर किती व्यक्तींची परीक्षा आहे?

Ans
A. 2
B. 1 ✔
C. 4
D. 3

Q.58 दिलेल्या मालिकेत प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

81 64 49 36 25 ?

Ans
- ✗ A. 14
- ✓ B. 16
- ✗ C. 15
- ✗ D. 18

Q.59 जर 'A' म्हणजे '÷' असेल, 'B' म्हणजे '×' असेल, 'C' म्हणजे '+' असेल आणि 'D' म्हणजे '–' असेल, तर खालील समीकरणात प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

89 C 72 A 12 B 4 D 25 = ?

Ans
- ✓ A. 88
- ✗ B. 83
- ✗ C. 87
- ✗ D. 85

Q.60 NOTICE या शब्दातील प्रत्येक स्वर इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगतच आधीच्या चौथ्या अक्षराने बदलला जातो आणि त्यानंतर अशा प्रकारे तयार झालेली सर्व अक्षरे इंग्रजी वर्णक्रमानुसार मांडली जातात. तर अशा प्रकारे तयार झालेल्या नवीन अक्षर-समूहात खालीलपैकी कोणते अक्षर उजवीकडून तिसरे असेल?

Ans
- ✓ A. K
- ✗ B. A
- ✗ C. E
- ✗ D. T

Q.61 दिलेल्या अक्षरांच्या मालिकेचा संदर्भ घ्या आणि प्रश्नाचे उत्तर द्या. मोजणी डावीकडून उजवीकडे करायची आहे.

(डावीबाजू) E D I S P V E I I S I A Q P W G U O I A E C (उजवीबाजू)

या मालिकेत, ज्यांच्या प्रत्येकाच्या लगत आधी एक स्वर येते आणि लगत नंतरही एक स्वर येते, अशी किती व्यंजने आहेत?

Ans
- ✗ A. 4
- ✗ B. 1
- ✗ C. 3
- ✓ D. 2

Q.62 इंग्रजी वर्णक्रमावर आधारित, खालील चार अक्षर-समूहांपैकी तीन एका विशिष्ट तऱ्हेने समान आहेत आणि ते मिळून एक गट तयार करतात. त्या गटात न बसणारा अक्षर-समूह कोणता आहे?

(सूचना: गटात न बसणारा हा त्याच्या व्यंजन/स्वरांच्या संख्येवर किंवा अक्षर-समूहातील त्याच्या स्थानावर आधारित नसावा.)

Ans
- ✗ A. RON
- ✓ B. NLJ
- ✗ C. AXW
- ✗ D. DAZ

Q.63 रमा A स्थानापासून चालायला सुरुवात करते. ती दक्षिणेकडे 4 km चालते. त्यानंतर ती डावीकडे वळते 6 km चालते. मग ती उजवीकडे वळते 8 km चालते. पुन्हा, ती उजवीकडे वळते 6 km चालते. तर A स्थानावर पुन्हा पोहोचण्यासाठी तिला किती अंतर (किमान अंतर) आणि कोणत्या दिशेने चालावे लागेल?

Ans
- ✗ A. दक्षिणेकडे 12 km
- ✗ B. उत्तरेकडे 8 km
- ✗ C. दक्षिणेकडे 8 km
- ✓ D. उत्तरेकडे 12 km

Q.64 जर + म्हणजे −, − म्हणजे ×, × म्हणजे ÷, ÷ म्हणजे +, तर खालील समीकरणातील प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?
53 - 4 ÷ 18 + 64 × 8 = ?

Ans
✗ A. 217
✗ B. 331
✗ C. 219
✓ D. 222

Q.65 खाली दिलेल्या संख्या आणि चिन्ह मालिकेचा संदर्भ घ्या आणि त्यापुढील प्रश्नाचे उत्तर द्या. सर्व संख्या केवळ एक-अंकी संख्या आहेत.

(डावी बाजू) 8 # 2 ! 3 $ % 6 & + 9 * % 4 # @ ! 7 + ? @ 1 + (उजवी बाजू)

जर मालिकेतून सर्व चिन्हे वगळली, तर खालीलपैकी कोणते हे उजवीकडून सातवे असेल?

Ans
✗ A. 6
✓ B. 2
✗ C. 3
✗ D. 9

Q.66 दिलेली विधाने आणि निष्कर्ष काळजीपूर्वक वाचा. विधानांमध्ये दिलेली माहिती खरी आहे असे गृहीत धरून, जरी ती सामान्यपणे ज्ञात असलेल्या तथ्यांशी भिन्न वाटत असली तरी, दिलेल्या निष्कर्षांपैकी कोणता/ते निष्कर्ष दिलेल्या विधानांशी तर्कसंगत आहे/आहेत ते ठरवा.

विधाने:
काही साबण बछडे आहेत.
काही बछडे फळे आहेत.

निष्कर्ष:
(I) काही साबण फळे आहेत.
(II) सर्व फळे बछडे आहेत.

Ans
✗ A. केवळ निष्कर्ष (I) तर्कसंगत आहे
✗ B. केवळ निष्कर्ष (II) तर्कसंगत आहे
✓ C. निष्कर्ष (I) ˙ वा (II) यांपैकी एकही तर्कसंगत ही
✗ D. निष्कर्ष (I) आणि (II) न्ही तर्कसंगत आहेत

Q.67 खाली दिलेल्या दोन जोड्यांप्रमाणे समान प्रारुपाचे अनुसरण करणारी जोडी निवडा. दोन्ही जोड्या समान प्रारुपाचे अनुसरण करतात.
OJV : LGS
EOQ : BLN

Ans
✗ A. EHL : CFI
✗ B. TEL : OAI
✗ C. KHG : GEC
✓ D. ING : FKD

Q.68 X, Y, Z, W, V आणि U या सहा व्यक्ती एका रांगेत उत्तरेकडे तोंड करून बसल्या आहेत.
X च्या उजवीकडे केवळ दोन व्यक्ती बसल्या आहेत. V हा U च्या लगत डावीकडे बसला आहे. X आणि W यांच्या दरम्यान केवळ Z बसला आहे. W रांगेच्या अगदी उजव्या टोकाला बसलेला नाही.
रांगेच्या अगदी उजव्या टोकाला कोण बसले आहे?

Ans
✗ A. Z
✓ B. U
✗ C. V
✗ D. X

Prepp
Your Personal Exams Guide

Q.69 दिलेल्या संख्या आणि चिन्हांच्या मालिकेचा संदर्भ घ्या आणि प्रश्नाचे उत्तर द्या. सर्व संख्या केवळ एक-अंकी आहेत.

(डावी बाजू) 7 Ω 5 3 @ & 9 $ 6 % 8 ^ 4 # 1 * £ 2 (उजवी बाजू)

जर मालिकेतील सर्व संख्या वगळल्या तर, खालीलपैकी डावीकडून सहाव्या स्थानावर काय असेल?

Ans
- ✗ A. #
- ✗ B. %
- ✓ C. ^
- ✗ D. $

Q.70 पूजा बिंदू A पासून प्रवासाला सुरुवात करते आणि दक्षिणेकडे 18 km अंतर पार करतो. त्यानंतर ती उजवीकडे वळते व 12 km अंतर कापते, पुन्हा उजवीकडे वळून 25 km प्रवास करते. त्यानंतर ती पुन्हा एकदा उजवीकडे वळतो आणि 13 km गाडी चालवते. शेवटी ती उजवीकडे शेवटचे वळण घेते, 7 km अंतर पार करून बिंदू P पाशी थांबते. तर, बिंदू A वर पुन्हा पोहोचण्यासाठी तिने कोणत्या दिशेने आणि किती (किमान/सर्वात कमी) अंतर पार केले पाहिजे? (उल्लेख नसल्यास, सर्व वळणे केवळ 90-अंशाची आहेत असे गृहीत धरावे.)

Ans
- ✓ A. पश्चिमेकडे 1 km
- ✗ B. पश्चिमेकडे 2 km
- ✗ C. पूर्वेकडे 2 km
- ✗ D. पूर्वेकडे 1 km

Q.71 A, B, C, D, P, Q आणि R या प्रत्येकाची परीक्षा सोमवारपासून सुरू होऊन त्याच आठवड्याच्या रविवारी संपणाऱ्या एकाच आठवड्यातील वेगवेगळ्या दिवशी आहे.
R आणि D यांच्या दरम्यान केवळ तीन व्यक्तींची परीक्षा आहे. D ची परीक्षा आठवड्याच्या शेवटच्या दिवशी आहे. B ची परीक्षा A च्या नंतर दुसऱ्या दिवशी आहे. C ची परीक्षा P च्या आदल्या दिवशी आहे. Q ची परीक्षा शुक्रवारी नाही.
तर Q च्या नंतर किती व्यक्तींची परीक्षा आहे?

Ans
- ✗ A. न
- ✗ B. न
- ✓ C. सहा
- ✗ D. च

Q.72 एका विशिष्ट सांकेतिक भाषेत,
A + B म्हणजे 'A हा B चा मुलगा आहे',
A – B म्हणजे 'A ही B ची बहीण आहे',
A × B म्हणजे 'A ही B ची पत्नी आहे' आणि
A % B म्हणजे 'A हे B चे वडील आहे'.
जर 'शाहिद + गौरी – हिमेश % जया × इशांत' असेल, तर शाहिदचे इशांतशी काय नाते असेल?

Ans
- ✓ A. पत्नीच्या वडिलांच्या बहिणीचा मुलगा
- ✗ B. पत्नीच्या वडिलांच्या भावाचा मुलगा
- ✗ C. पत्नीच्या आईच्या भावाचा मुलगा
- ✗ D. पत्नीच्या आईच्या बहिणीचा मुलगा

Q.73 इंग्रजी वर्णक्रमावर आधारित दिलेल्या मालिकेत प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय आले पाहिजे?

DFJ MOS VXB EGK ?

Ans
- ✗ A. NQS
- ✗ B. NOQ
- ✗ C. NOS
- ✓ D. NPT

Your Personal Exams Guide

Q.74 हा प्रश्न दिलेल्या शब्दांवर आधारित आहे.

PER KGS NUS DAM

वरील प्रत्येक शब्दामधील, प्रत्येक स्वर इंग्रजी वर्णक्रमातील त्याच्या लगतच नंतरच्या अक्षराने बदलला आणि प्रत्येक व्यंजन इंग्रजी वर्णक्रमातील त्याच्या लगतच आधीच्या अक्षराने बदलला, तर अशा प्रकारे तयार होणाऱ्या किती अक्षर-समूहांमध्ये एकही स्वर असणार नाही?

Ans
✔ A. तीन
✘ B. एक
✘ C. चार
✘ D. दोन

Q.75 खाली दिलेल्या दोन जोड्यांप्रमाणे समान प्रारुपाचे अनुसरण करणारी जोडी निवडा. दोन्ही जोड्या समान प्रारुपाचे अनुसरण करतात.

KNS : HPV
LLL : INO

Ans
✘ A. LVW : IWZ
✘ B. MKP : JMR
✘ C. RJW : OLY
✔ D. FPI : CRL

Q.76 एका प्रश्नानंतर (I) आणि (II) असे क्रमांक असलेली दोन विधाने दिली आहेत. त्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी विधानांमध्ये दिलेली माहिती पुरेशी आहे की नाही, हे तुम्हाला ठरवायचे आहे. दोन्ही विधाने वाचा आणि योग्य उत्तर निवडा.

प्रश्न: A, B, C, D आणि E हे पाच व्यक्ती एका गोलाकार टेबलाभोवती केंद्राकडे तोंड करून बसल्या आहेत. A आणि C यांच्यामध्ये कोण बसले आहे?
(I) B हा A च्या अगदी उजवीकडे बसला आहे; D हा B च्या अगदी उजवीकडे बसला आहे.
(II) E हा C च्या अगदी डावीकडे बसलेला आहे; D हा A च्या लगत नाही.

Ans
✘ A. केवळ विधान II मधील माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे, तर विधान I मधील माहिती पुरेशी नाही.
✘ B. I आणि II हे दोन्ही विधाने एकत्रितपणे प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेसे नाहीत.
✔ C. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी विधाने I आणि II दोन्ही मिळून (आणि केवळ विधान I किंवा केवळ विधान II नव्हे) पुरेशी आहेत.
✘ D. केवळ विधान I मधील माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे, तर विधान II मधील माहिती पुरेशी नाही.

Q.77 ABANDON या शब्दातील प्रत्येक स्वर इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगत नंतर येणाऱ्या अक्षरात आणि प्रत्येक व्यंजन इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या लगत आधी येणाऱ्या अक्षरात बदलण्यात आले, तर अशा प्रकारे तयार झालेल्या अक्षरांच्या नवीन गटात खालीलपैकी कोणते अक्षर उजवीकडून दुसरे असेल?

Ans
✘ A. M
✘ B. C
✘ C. B
✔ D. P

Q.78 G, H, J, K, L आणि P हे सहा जण एकाच इमारतीच्या सहा वेगवेगळ्या मजल्यांवर राहतात. इमारतीतील सर्वात खालचा मजला क्रमांक 1 आहे, त्याच्या वरचा मजला क्रमांक 2 आहे आणि अशाच प्रकारे पुढे सर्वात वरचा मजला क्रमांक 6 आहे. K च्या वरच्या मजल्यावर केवळ L राहतो. H हा K च्या लगतच खालच्या मजल्यावर राहतो. J च्या खालच्या मजल्यावर केवळ G राहतो. तर, H च्या खालच्या मजल्यावर किती जण राहत असतील?

Ans
✘ A. एक
✘ B. दोन
✘ C. चार
✔ D. तीन

| | | |
|---|---|---|
| Q.79 | C, D, E, O, P आणि Q या सहा व्यक्ती उत्तरेकडे तोंड करून एका रांगेत बसल्या आहेत.<br>E च्या डावीकडे केवळ दोन व्यक्ती बसल्या आहेत. E आणि Q यांच्यादरम्यान केवळ दोन व्यक्ती बसल्या आहेत. Q आणि D यांच्यादरम्यान केवळ एक व्यक्ती बसली आहे. O ही व्यक्ती P च्या लगत डावीकडे बसली आहे.<br>C च्या उजवीकडे किती व्यक्ती बसल्या आहेत? | |
| Ans | ✗ A. एकही ही<br>✗ B. न<br>✓ C. एक<br>✗ D. न | |

| | | |
|---|---|---|
| Q.80 | हा प्रश्न दिलेल्या शब्दांवर आधारित आहे.<br><br>THIS KIND CORE FLOP<br><br>दिलेल्या प्रत्येक शब्दामधील प्रत्येक अक्षर इंग्रजी वर्णक्रमातील त्याच्या लगतच आधीच्या अक्षराने बदलले, तर अशा प्रकारे तयार होणाऱ्या शब्दांपैकी किती शब्दांमध्ये किमान एक स्वर असेल? | |
| Ans | ✗ A. न<br>✗ B. चार<br>✗ C. न<br>✓ D. एक | |

Section : **General Awareness and Current Affairs**

| | | |
|---|---|---|
| Q.81 | मे 2026 मध्ये, सिंधू जल करार विवादासंदर्भात कोणत्या आंतरराष्ट्रीय संस्थेचा निर्णय भारताने फेटाळला? | |
| Ans | ✗ A. इंटरनॅशनल ट्रिब्यूनल फॉर द लॉ ऑफ द सी पॅनेल<br>✗ B. इंटरनॅशनल क्रिमिनल कोर्ट ज्युडीशियल व्ह यू चेंबर<br>✓ C. पर्मनंट कोर्ट ऑफ आर्ब्रिट्रेशन ट्रिब्यूनल ॲट द हेग<br>✗ D. युयट ेड नेशन्स सिक्युरिटी कौन्सिल सँक्शन्स कमिटी | |

| | | |
|---|---|---|
| Q.82 | 2026 मध्ये, गुजरात मधील छारी-धांड (Chhari-Dhand) कोणत्या आंतरराष्ट्रीय पर्यावरणीय मान्यतेमुळे चर्चेत आले होते? | |
| Ans | ✗ A. गतिक व्याघ्र अधिवास द<br>✗ B. UNESCO जैवध राखीव क्षेत्राचा द<br>✓ C. रामसर स्थळ म्हणून मा कन<br>✗ D. गतिक वारसा स्थळ म्हणून मान्य | |

| | | |
|---|---|---|
| Q.83 | 31 मार्च 2026 ला नौदल जहाज यार्ड 1280 (शची) खालीलपैकी कोणत्या राज्यात कार्यान्वित (launched) करण्यात आली? | |
| Ans | ✗ A. महाराष्ट्र<br>✗ B. आंध्र प्रदेश<br>✓ C. गोवा<br>✗ D. मिळड | |

| | | |
|---|---|---|
| Q.84 | फेब्रुवारी 2026 मध्ये, RBI ने द्वैमासिक पतधोरण आढावा जाहीर करताना कोणती पतधोरण भूमिका कायम ठेवली? | |
| Ans | ✗ A. स्तारवा रणात्मक भूमिका कायम ठेवली<br>✓ B. तटस्थ रणात्मक भूमिका कायम ठेवली<br>✗ C. अनुकूल रणात्मक भूमिका कायम ठेवली<br>✗ D. कठोर रणात्मक भूमिका कायम ठेवली | |

Prepp
Your Personal Exams Guide

**Q.85** मे 2026 ह्या महिन्यात, भारतीय जनता पक्षाने कोणत्या भारतीय राज्यात पहिल्यांदाच आपले सरकार स्थापन केले?

Ans
- ✗ A. तमिळड ू
- ✓ B. पश्चिम बंगाल
- ✗ C. ओडिशा
- ✗ D. केरळ

**Q.86** 'डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण (DPDP) अधिनियम, 2023 आणि त्याचे 2025 मधील नियम मुलांच्या संरक्षणासाठी "पालकांची पडताळणीयोग्य संमती" प्रदान करतात. या आराखड्यांतर्गत खालीलपैकी कोणती ऑनलाइन कृती स्पष्टपणे प्रतिषिद्ध करण्यात आली आहे?

Ans
- ✗ A. शैक्षणिक संशोधसाठी   तृय   पक्षांसोबत अमिक   डेटा सामायिक करणे.
- ✗ B. स्वयंचलित वय-नि ʼरण नियमावलीनंतर बालकाच्या माहिवर   प्रक्रिया करणे.
- ✓ C. मुलांच्या वर्तणुकीवर देखरेख आणि त्यां   लक्ष्य करणा   हिरातबाजी   .
- ✗ D. लका  ʼच्या संमन ` आपत्कालीन सेवांसाठी जिओलोकेशन डेटा गोळा करणे.

**Q.87** 22 ते 30 एप्रिल 2026 या कालावधीत 6 व्या आशियाई बीच गेम्सचे यजमानपद कोणत्या शहराने भूषवले होते?

Ans
- ✓ A. सान्या (Sanya)
- ✗ B. बीजिंग (Beijing)
- ✗ C. हांगझोऊ (Hangzhou)
- ✗ D. ग्वांगझू (Guangzhou)

**Q.88** एप्रिल 2026 मध्ये, भारत सरकारने अशोक लाहिरी यांची उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करून कोणत्या राष्ट्रीय धोरण विचारगटाची (think tank) पुनर्रचना केली?

Ans
- ✓ A. NITI आयोग
- ✗ B. राष्ट्रीय कास   परिषद
- ✗ C. राष्ट्रीय सांख्यिकी आयोग
- ✗ D. त्त   आयोग

**Q.89** ऑक्टोबर 2025 मध्ये भारताला हेलावून टाकणारे मोंथा चक्रीवादळ कोणत्या राज्याच्या किनारपट्टीवर धडकले होते?

Ans
- ✓ A. आंध्र प्रदेश
- ✗ B. ओडिशा
- ✗ C. मिळड   ू
- ✗ D. पश्चिम बंगाल

**Q.90** एप्रिल 2026 मध्ये, भारत-श्रीलंका द्विपक्षीय डायव्हिंग सरावाचे (IN-SLN DIVEX 2026) 4थे पर्व कोठे आयोजित करण्यात आले?

Ans
- ✗ A. त्रिंकोमाली, श्रीलंका
- ✓ B. कोलंबो, श्रीलंका
- ✗ C. शाखापट्टणम   , भारत
- ✗ D. कोची, भारत

**Q.91** ICC मेन्स T20 वर्ल्ड कप 2026, एक प्रीमियर इंटरनॅशनल क्रिकेट टूर्नामेंट,कोणत्या दोन क्रिकेट राष्ट्रांनी (क्रिकेटिंग नेशन्स) संयुक्तपणे आयोजित केली होती?

Ans
- ✗ A. इंग्लंड आणि वेल्स
- ✗ B. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड
- ✗ C. वेस्ट इंडीज आणि युयट `ड स्टेट्स
- ✓ D. भारत आणि श्रीलंका

Prepp Your Personal Exam Guide

Q.92 कोणत्या देशाने 26 मार्च ते 30 मार्च 2026 दरम्यान याउंडे (Yaoundé) येथे आयोजित WTO च्या चौदाव्या मंत्रीस्तरीय परिषदेचे (MC14) आयोजन केले होते?

Ans
- ✗ A. स्विझर्लंड
- ✗ B. दक्षिण आफ्रिका
- ✓ C. कॅमेरून
- ✗ D. केनिया

Q.93 फेब्रुवारी 2026 मध्ये वायूशक्ती-2026 हा सराव कोणत्या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता?

Ans
- ✗ A. सूर्यलंका एअर फोर्स स्टेशन, आंध्र प्रदेश
- ✗ B. हिंडन एअर फोर्स स्टेशन, उत्तर प्रदेश
- ✗ C. एअर फोर्स स्टेशन जोधपूर, राजस्थान
- ✓ D. खरण  फील्ड फायरिंग रेंज, जैसलमेर, राजस्थान

Q.94 इंडियन प्रीमियर लीग 2026 क्रिकेट स्पर्धेत कोणत्या खेळाडूने 'मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयर ऑफ द सीझन'चा पुरस्कार जिंकला?

Ans
- ✗ A. कार्तिक शर्मा
- ✗ B. शिवांग कुमार
- ✓ C. वैभव सूर्यवंशी
- ✗ D. डेवाल्ड ब्रेव्हीस

Q.95 FY 2026 – 27 च्या जेंडर बजेट स्टेटमेंटमध्ये, महिला आणि मुलींच्या कल्याणासाठी नेमकी किती आर्थिक तरतूद करण्यात आली होती?

Ans
- ✗ A. ₹ 5.41 लाख कोटी
- ✗ B. ₹4.49 लाख कोटी
- ✓ C. ₹5.00 लाख कोटी
- ✗ D. ₹3.50 लाख कोटी

Q.96 2026–27 या कालावधीसाठी भारतीय उद्योग महासंघाचे (Confederation of Indian Industry) अध्यक्ष म्हणून कोणी पदभार स्वीकारला आहे?

Ans
- ✗ A. राजीव मेमा
- ✗ B. अर  ंद पनगढिया
- ✓ C. आर मुकुंदन
- ✗ D. अशोक लाहि

Q.97 मे 2026 मध्ये, पुरुषांची 100 मीटर शर्यत 10.10 सेकंदांपेक्षा कमी वेळेत पूर्ण करणारा पहिला भारतीय धावपटू कोण बनला?

Ans
- ✗ A. गुलवीर सिंग
- ✗ B. शाल  टी. के.
- ✓ C. गु  ंदरवीर सिंग
- ✗ D. तेजस्विन शंकर

Q.98 जानेवारी 2026 मध्ये, भारताने एका नेत्याच्या बलिदानाचे स्मरण करण्यासाठी राजघाटावर विधीपूर्वक समारंभ आणि आदरांजलीसह एक दिवस पाळला. या राष्ट्रीय स्मरणासाठी अधिकृतपणे कोणती तारीख निश्चित केली आहे?

Ans
- ✗ A. संन  दिन
- ✗ B. राष्ट्रीय एकात्म  दिन
- ✗ C. सुशासन दिन
- ✓ D. हुत्मा  दिन

Q.99 'बायोस्पेक्ट्रम इंडिया एक्सलन्स अवॉर्ड्स, 2025' मध्ये 'सेल अँड जीन थेरपी' मधील आद्यप्रवर्तक कार्यासाठी कोणत्या कंपनीला 'विशेष मान्यता पुरस्कार' मिळाला?

Prepp
Your Personal Exams Guide

Ans

✔ A. मिल्टेन्यी बायोटेक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड

✗ B. सीरम इंस्टीट्यूट

✗ C. भारत बायोटेक

✗ D. रिलायन्स लाइफ सायन्सेस

Q.100 भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (ISRO) डिसेंबर 2025 मध्ये आयोजित केलेल्या LVM3 प्रक्षेपण वाहनाच्या सहाव्या ऑपरेशनल उड्डाणादरम्यान, AST SpaceMobile च्या कम्युनिकेशन सॅटेलाइटचे प्रक्षेपण कोणत्या मोहिमेअंतर्गत करण्यात आले होते?

Ans

✔ A. LVm3-M6/BlueBird ब्लॉक-2 मिशन

✗ B. चांद्रयान-3 मिशन

✗ C. LVM3-M5/CMS-03 मिशन

✗ D. वनवेब लाँच मिशन

"

Prepp Your Personal Exam Guide